REGISTERED No. B. 3434




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १४ | पुणें, बुधवार तारीख ९ जून, १९४८ | अंक २३


## दि रत्नाकर बँक, लि.

स्थापना : १९४३

—: शाखा :—

(१) कोल्हापूर, (२) शाहुपुरी, (३) सांगली, (४) मिरज, (५) जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल | ... | २०,१२,००० |
| विक्री केलेलं शेअर भांडवल | ... | ६,२७,२०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ३,१३,६०० |
| रिझर्व्ह फंड | ... | १०,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ३८,००,००० |

—*अद्यावत बँकिंग व्यवहार केले जातात*—

**नामदार बी. बी. पाटील.** B. A., LL. B., डेव्हलपमेंट मिनिस्टर, सांगली स्टेट. चेअरमन

**श्री. गं. सि. चौगुले.** M. L. A. कोल्हापूर व्हा. चेअरमन

**एल. एन्. शहा.** B. Com., C. A. I. I. B. मॅनेजर

विमेदारांचे नियंत्रणाखाली चाललेली व त्यांचेच मालकीची आदर्श विमा कंपनी

## दि सुप्रीम म्यूच्युअल ॲशुअरन्स कंपनी लि.

आपली सुप्रीम म्यूच्युअलची निवड योग्य आहे.

——कारण——

★—ती भक्कम पायावर आधारलेली आहे.
★★—विमेदारांचें हित हेंच तिचें ध्येय आहे.
★★★—विम्याचे क्लेम्स देण्यांत ती अत्यंत दक्ष आहे.
★★★★—विमेदारांना सोईच्या व आवडीच्या विमायोजना देण्यांत विशेष लक्ष घालते.

आजच पॉलिसी घेऊन भविष्यकाळाची तरतूद करणें आपलें हिताचे आहे.

सढळ अटींवर एजन्सीज देणें आहेत. —भेटा अगर लिहा—

**त्र्यं. दा. देशपांडे** बी. ए., एलएल. बी. सेक्रेटरी

**व. न. म्हैसूर** एम. ए., एलएल. बी. मॅनेजर

हेड ऑफिस:—८६६ सदाशिव पेठ, पुणें २.

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें










वर्कशॉप मशिनरी (२)
हेवी ड्यूटी
शिमोगा लेथ
(८′—१०″)
संपूर्ण देशी, पहिल्या प्रतीचा, तज्ज्ञांचे देखरेखीखालीं कुशल कारागिरांनीं अद्यावत् साधनांनीं बनविलेला
— चौकशी स्थान —
केळकर बंधु, बुधवार चौक, पुणें २.

## विविध माहिती

**हिंदुस्थान सरकारचें नवें कर्ज**—१९४८-५२ च्या २¾% व्याजाच्या सरकारी रोखेदारांच्या सोईसाठीं हिंदुस्थान सरकारनें १५ नोव्हेंबर, १९६२ रोजीं परत फेडण्याचे आणखी कर्जरोखे विक्रीस काढले. १ जून रोजीं विक्रीस प्रारंभ होऊन व ३५ कोटी रु. जमून ती १ जून रोजींच बंद झाली.

**स्वस्त धान्याचीं दुकानें**—योग्य दरानें धान्य-विक्री करणारीं २,००० दुकानें मद्रास सरकारनें चालविलीं आहेत. त्यांत आतां आणखी १,५०० दुकानांची भर घालण्यांत आली आहे.

**कंपन्यांची चलती व नोकऱ्यांची खैरात**—मार्शल योजनेखालील मोठाल्या ऑर्डरींची अपेक्षा व दारूगोळ्याची वाढती मागणी ह्यांमुळें अमेरिकन कंपन्यांना सध्या तेजी आहे. त्या कारणानें कॉलेजांतून बाहेर पडणाऱ्या २ लक्ष पदवीधरांची नोकऱ्या तेथें वाट पहात आहेत.

**विमा व्यवसायांत हिंदीला प्राधान्य**—विमा व्यवसायाकरतां जी इंग्रजी परिभाषा वापरावी लागते, तिच्या ऐवजीं योग्य असे हिंदी शब्द सुचविण्याची विनंति इंडिअन लाइफ ऑफिसेस असोसिएशन ह्या संस्थेनें सभासद-कंपन्यांना केली आहे. इंग्रजी शब्दांऐवजी शक्य तेथें हिंदी शब्द रूढ करण्याचा संस्थेचा हेतू आहे. विमा-कंपन्यांनीं आपलीं हिंदी माहितीपत्रकें व वाङ्मयहि आपणांकडे पाठवावें असें असोसिएशननें सुचविलें आहे.

**हिंदी बनावटीची नवी बोट**—गांधीग्राम येथील शिंदिया स्टीम नॅव्हिगेशन कंपनीच्या गोदींत ८,००० टनांच्या एका नव्या बोटीचा तळ बांधण्याच्या कामाला प्रारंभ करण्यांत आला आहे. पं. जवाहरलाल नेहरू ह्यांनीं 'जलउषा' ह्या पहिल्या बोटीचा जलवितरणसभारंभ नुकताच केला. त्या बोटीवर एंजिन्स बसविण्याचें काम चालू आहे. 'जलप्रभा' ह्या नांवाची आणखी एक बोट येत्या ऑक्टोबर महिन्यांत तयार होईल, असा अंदाज आहे.

**इटली-पाकिस्तान व्यापारी सहकार्य**—इटलीचे व्यापारमंत्री आणि पाकिस्तानचे व्यापारमंत्री ह्यांच्यांत उभय देशांतील व्यापारी व औद्योगिक संबंध वाढविण्यासंबंधीं नुकतीच बोलणीं झालीं.

**पाकिस्तानमधील हिंदी नोटा**—पाकिस्तानमधील नागरिकांनीं आपल्या जवळील हिंदी संघराज्याच्या चलनी नोटा परत देऊन त्याऐवजीं पाकिस्तानच्या घ्याव्या अशी सूचना पाकिस्तानच्या अर्थव्यवस्था खात्यानें केली आहे. पाकिस्तानच्या स्वतंत्र नोटा ता. १ एप्रिलपासून निघाल्या असल्या तरी ता. ३० सप्टेंबर, १९४८ पर्यंत हिंदी नोटा तेथें कायदेशीर रीत्या व्यवहारांत राहणार आहेत. तथापि, त्या सुमारास गर्दी होऊन नागरिकांचें नुकसान होऊं नये म्हणून पाकिस्तान सरकारनें वरील सूचना आपल्या नागरिकांना दिली आहे.

**सहकारी संस्था व सरकारी धान्याचीं दुकानें**—सरकारी धान्याचीं दुकानें सहकारी संस्थांना चालविण्यास देण्याचा निर्णय मुंबई सरकारनें घेतल्यापासून ७० सरकारी धान्याचीं दुकानें ग्राहकांच्या सहकारी संस्थांच्या ताब्यांत देण्यांत आलीं आहेत. तथापि ह्या संस्थांचे सभासद म्हणून जितक्या लोकांनीं नांवें नोंदवावीं अशी सरकारची अपेक्षा होती तितक्या लोकांनीं तीं नोंदविलीं नाहींत असें समजतें.

**संयुक्त प्रांतांत वृत्तपत्राचा कागद**—डेराडून येथील जंगल-विषयक संशोधन खात्यांत सध्या बरेंच संशोधन चालू आहे. बांबू, गवत इत्यादींचा उपयोग करून वृत्तपत्रांना लागणारा न्यूजप्रिंट कागद स्वस्तांत तयार करता येईल असें ह्या संशोधनाच्या प्रगतीवरून वाटत आहे. खेडेगांवांतून शिक्षणाचा प्रसार करण्यासाठीं अशा स्वस्त कागदाचा फार उपयोग होईल. हिमालयांतील बांबू व इतर कांहीं झाडांचा उपयोग करून कृत्रिम रेशीम तयार करण्याचा कारखानाहि संयुक्त प्रांतांत उभारता येण्यासारखा आहे. ह्या कारखान्यासाठीं लागणारी यंत्रसामुग्री व तज्ज्ञ आणविण्यासाठीं परदेशांशीं बोलणींही चालू झालीं आहेत.

**तेलाच्या घाण्यांचें संरक्षण**—हिंदुस्थान सरकारच्या शेतकी खात्यानें खेड्यांतील तेलाच्या घाण्यांच्या धंद्यासंबंधीं चौकशी करण्याचें ठरविलें आहे. तेलाच्या घाण्यांची सध्याची परिस्थिति काय आहे, त्या धंद्याला यांत्रिक साह्यानें तेल काढणाऱ्या गिरण्यापासून संरक्षण देणें इष्ट आहे काय, इत्यादि प्रश्नांचा विचार करण्यासाठीं एक कमिटी नेमण्यांत आली आहे. प्रांतिक सरकारांकडे एक प्रश्नावली पाठवून तेलाच्या घाण्यांच्या धंद्याची माहिती मागविण्यांत आली आहे.

**पोलादाच्या उत्पादनांत वाढ करण्याची आवश्यकता**—हिंदुस्थान सरकारनें देशांतील पोलादाचें उत्पादन वार्षिक १० लाख टनांनीं वाढविण्याचें ठरविलें आहे. ह्या दृष्टीनें पहाणी करण्यासाठीं सल्लामसलत देणारे एंजिनिअर्स नेमण्यांत आले आहेत. ह्या तज्ज्ञांची पहाणी पूर्ण झाल्यावर १० लाख टन पोलाद निर्माण करणारा एकच कारखाना काढावा, का प्रत्येकीं ५ लाख टनांचें उत्पादन करणारे दोन कारखाने काढावे ह्यासंबंधीं सरकार निर्णय घेणार आहे. ह्या कार्यांत आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या तीन कंपन्या सरकारला मदत करीत आहेत.

-सर्व प्रांतांतील-
सुती – गरम – रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

नं. २० साबण
बार सोप आणि वडी वापरा
माणिक सोप वर्क्स, कराड (जि. सातारा)

# अर्थ

बुधवार, ता. ९ जून १९४८





प्रो. वा. गो. काळे

संपादक :

श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## सहकारी खात्याचा ताजा अहवाल

### (१९४५-४६)

मुंबई प्रांताच्या सहकारी खात्याचा ३० जून, १९४६ अखेर संपलेल्या वर्षाचा अहवाल नुकताच हातीं आला आहे. श्री. एस. एम. इक्रम ह्यांच्या सहींचा हा अहवाल असून त्यावर १७ फेब्रुवारी, १९४७ अशी तारीख आहे. ह्यावरून, प्रस्तुत अहवाल किती दीर्घ काळ पडून होता आणि त्याच्या प्रसिद्धीस किती विलंब झाला आहे ह्याची कल्पना येईल. सरकारी अहवालांच्या सत्वर प्रसिद्धीचें अगत्य प्रतिपादन करण्याची वास्तविक आवश्यकता नाहीं.

अहवालाचे वर्षी सहकारी चळवळीची अनेकविध प्रगति झाली. शेतकरी कर्जनिवारण कायद्याच्या अंमलबजावणीच्या पूर्वतयारीचें प्रतिबिंब खालील तक्त्यांतून पडलेलें आढळून येईल. क्रेडिट, थ्रिफ्ट आणि क्रेडिट आणि मल्टिपर्पज सोसायट्यांची वाढलेली संख्या उठून दिसते.

**१९४५-४६ मधील नव्या सोसायट्या**

| सोसायटीचा प्रकार | सोसायट्यांची संख्या | |
|---|---|---|
| **शेतकी क्रेडिट--** | नोंदल्या | लिक्विडेशनमध्यें गेल्या |
| (१) क्रेडिट............... | १६७ | २१ |
| (२) थ्रिफ्ट आणि क्रेडिट...... | २२६ | ... |
| (३) मल्टिपर्पज......... | ८३ | ३ |
| **शेतकी बिगर क्रेडिट—** | | |
| (१) बेटर फार्मिंग (जॉ. फार्मिंग सुद्धां) | ७ | — |
| (२) सेल, ता. डे. असोसिएशन्स, क्रॉप प्रोटेक्शन......... | ३७ | ५ |
| **बिगर शेतकी सोसायट्या—** | | |
| (१) पगारदारांच्या | ११ | १ |
| (२) अर्बन क्रेडिट | २८ | ४ |
| हौसिंग | १२ | २ |
| प्रोडयूसर्स | २१ | – |
| वीव्हर्स | २० | – |
| कंझ्यूमर्स | १९ | १० |
| युनियन्स | ३ | २ |
| इतर | ४ | – |
| बँकिंग युनियन्स | १ | – |
| १९४५-४६ | ६३९ | ४८ |
| १९४४-४५ | ५४८ | २३ |

**शेतकी पतपेढ्या (मल्टिपर्पज सोसायट्या धरुन)**

| | १९४४-४५ | १९४५-४६ |
|---|---|---|
| सोसायट्या | ४,३४४ | ४,७९६ |
| त्यांचे सभासद | २,०८,६६८ | २,३२,२८२ |
| | रु. | रु. |
| खेळतें भांडवल | २,७२,२३,२४६ | ३,०६,८२,४०९ |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,०५,४७,९५१ | १,११,९५,७०५ |
| सभासदांच्या ठेवी | १७,१३,१२५ | १७,७५,६४५ |
| बिगर सभासदांच्या ठेवी | १८,२३,१८४ | १९,८५,६७२ |
| भाग भांडवल | ४४,४६,०८८ | ५१,४४,६१० |
| बँकांचें देणें कर्ज | ८४,९८,४८५ | १,००,१२,६५० |
| इतर देणें | १,८४,४१३ | ५,९८,१२७ |

**शेतकी पतपेढ्यांची वर्गवारी**

| | १९४४-४५ | १९४५-४६ |
|---|---|---|
| अ | ५९६ | ६३३ |
| ब | १,५६८ | १,७२१ |
| क | १,११५ | १,१५५ |
| ड | ७७९ | ७३६ |
| वर्गवारी केली नाहीं | २९६ | ५५२ |
| एकूण | ४,३४४ | ४,७९६ |

सोसायट्यांची परिस्थिति निश्चितपणें सुधारली आहे. अ, ब आणि क वर्गांतील सोसायट्यांची संख्या वाढली आहे. एकूण ४,७९६ सोसायट्यांपैकी १,१७१ सोसायट्यांत थकबाकी नाहीं, २६३ सोसायट्यांत ती ५% आहे; ३४१ सोसायट्यांत ती ६ ते १०% आहे, ६५४ सोसायट्यांत ती ११ ते २५% आहे, ९४० सोसायट्यांत ती २६ ते ५०% आहे आणि १,४३० सोसायट्यांत ती ५०% पेक्षा ज्यास्त आहे.

मल्टिपर्पज सोसायट्यांची संख्या ८४ ची २६४ झाली आणि त्यांचे सभासद १४,०३४ चे २०,९२५ झाले. त्यांच्या व्यवहाराचा तुलनात्मक तक्ता खाली दिला आहे,—

| | १९४४-४५ | १९४५-४६ |
|---|---|---|
| | रु. | रु. |
| भाग भांडवल | ४,०७,७६८ | ६,०३,२६० |
| रिझर्व्ह व इतर फंड | २,३३,२७० | ४,२०,३८७ |
| खेळतें भांडवल | १७,४३,४७३ | २४,६०,९३१ |
| एकूण येणें कर्ज | ६,३१,५८० | ९,१०,६४२ |
| विक्रीवरील कमिशन | ८२,२९५ | १,१३,३३९ |

प्राथमिक लँड मॉर्गेज बँकांची संख्या १६ ची १५ झाली. ११ बँकांनीं नफा दाखविला; त्या सर्वांच्या नफ्याची रकम २१,०५४ रु. झाली. १५ बँकांनीं मिळून २५० अर्जदारांना एकूण ३,२३,९०० रु. कर्ज वाटलें. वर्षअखेर एकूण येणें ३१,४२,७०८ रु. होतें. प्रांतिक सहकारी लँड मॉर्गेज बँकेच्या व्यवहारांत व किफायतशीरपणांतहि घट झाली आहे.

## स्फुट विचार

### आशिआ खंडाचें औद्योगीकरण व आर्थिक उन्नती

संयुक्त राष्ट्रसंघाच्या आशिआ व अतिपूर्वविषयक आर्थिक संघटनेचें अधिवेशन उटकमंड येथें चालू आहे. ह्या अधिवेशनाला आशिआ खंडाच्या औद्योगीकरणाच्या दृष्टीनें महत्त्व आहे. जगांतील फार मोठी लोकसंख्या आशिआंत व अतिपूर्वेकडील राष्ट्रांत रहात आहे. पौर्वात्य देशांतील लोकांच्या रहाणीचें मान वाढविल्याशिवाय आतां आपल्याला सुद्धा सुखानें जगता येणार नाहीं, ही गोष्ट औद्योगिक दृष्ट्या पुढारलेल्या राष्ट्रांना पटलेली आहे. ह्या जाणिवेंतूनच संयुक्त राष्ट्रसंघाच्या वरील संघटनेचा जन्म झालेला आहे. आशिआंतील राष्ट्रांचें औद्योगीकरण झपाट्यानें झालें पाहिजे ह्याबद्दल दुमत नसलें तरी तें कोणत्या मार्गानें करावें ह्याबद्दल मात्र एकवाक्यता होऊं शकत नाहीं. आशिआंतील मागासलेल्या राष्ट्रांना भांडवली माल व यंत्रज्ञ ह्याच्यासाठी सूर्त परदेशांकडेच पहाणें भाग आहे. तथापि, हें साह्य घेतांना आपआपल्या देशाचें राजकीय स्वातंत्र्य गमावून बसण्याची त्यांची तयारी नाहीं हा मुद्दा हिंदुस्थानचे पंतप्रधान पं. नेहरू ह्यांनीं आपल्या उद्घाटनाच्या भाषणांत स्पष्ट केलाच आहे. प्रत्येक देशाच्या गरजा, भौगोलिक परिस्थिति, अर्थसाधनें व सांस्कृतिक परंपरा वेगवेगळ्या असतात. अर्थातच औद्योगीकरण करण्याचा मार्ग ज्या त्या देशाला स्वतंत्रपणें आखण्याची मुभा असणें आवश्यक आहे. इंग्लंड—अमेरिकेसारख्या देशांत ज्या गतीनें, दिशेनें व वैयक्तिक स्वार्थांच्या दृष्टीनें औद्योगीकरण झालें, तो सर्वच प्रकार जसाच्या तसा उचलणें पौर्वात्य राष्ट्रांना पोषक होणार नाहीं. तेव्हां, जीं पुढारलेलीं राष्ट्रें आशिआला औद्योगिक मदत करण्यास तयार असतील त्यांनीं सावकारी अटी न लादता अशी मदत करण्यास तयार झालें पाहिजे. तरच स्वार्थाबरोबर परार्थहि साधणें त्यांना शक्य होईल.

### द. आफ्रिकेंतील श्वेतवर्णीयांचें धोरण

२६ मे रोजीं झालेल्या दक्षिण आफ्रिकेंतील पार्लमेंटच्या निवडणुकींत जनरल स्मटस ह्यांच्या युनायटेड पक्षास मताधिक्य न मिळाल्याकारणानें, नॅशनॅलिस्ट पक्षाचें सरकार आतां अधिकारारूढ होत आहे. नॅशनॅलिस्ट पक्षास युरोपियनेतर सर्व लोक गुलामांप्रमाणें वाटतात. द. आफ्रिकेंतील ८० लक्ष नेटिवांपैकी २० लक्ष लोक शहरांत रहातात. कामासाठी हे लोक शहरांत यावयास पाहिजे असले, तरी त्यांचें तेथें वास्तव्य मात्र युरोपियनांना नको वाटतें ! सर्व नेटिवांची "रिझर्व्हज" मध्यें हकालपट्टी करून, अवश्य तेवढ्याच मजुरांस शहरांत व युरोपियनांच्या शेतांत येऊं द्यावें; त्यांना कामगार संघ काढण्यास बंदी असावी; त्यांना कोणतेहि राजकीय अधिकार असूं नयेत, असें नॅशनॅलिस्ट पक्षाचें मत आहे. ज. स्मटस ह्यांच्या सरकारनें नेमलेल्या जस्टिस फागन कमिशनचें मत मात्र नेटिवांस इतकें प्रतिकूल नाहीं. जनरल स्मटस ह्यांच्या पक्षाची निवडणुकींत सरशी होईल व नेटिवांबाबत सरकारी धोरण आणखी प्रतिगामी होणार नाहीं, ही अपेक्षा फोल ठरली असून श्वेतवर्णीयांच्या अरेरावीस आतां जास्त वाव निर्माण झाला आहे.

### कापडाचा जागतिक व्यापार मर्यादितच राहणार

कापडाचा जागतिक निर्गत व्यापार त्याच्या उत्पादनाच्या मानानें अद्याप फारसा सुधारलेला नाहीं. युद्धपूर्व उत्पादनाच्या मानानें १९४७ सालीं जागतिक उत्पादन ८५% झालें परंतु जागतिक निर्गत व्यापार मात्र ५७% च झाला. १९३६–३८ मध्यें एकूण उत्पादनाच्या २०% उत्पादन निर्गत झालें; १९४७ मधील तत्सम प्रमाण फक्त ११% आहे. १९५० सालीं कापडाचा जेवढा जागतिक खप होईल, त्याच्या फक्त १०% कापड आयातीच्या मार्गानें उपलब्ध होईल, अशी ग्रेट ब्रिटनमधील कापड बोर्डाची अपेक्षा आहे. म्हणजे, कापडाचा परराष्ट्रीय व्यापार लवकर वाढण्याचा संभव नाहीं. उत्पादन आणि निर्गत ह्यांचेमधील प्रमाण युद्धपूर्वकाल आणि सद्यःकाल ह्यांत कसें बदललें आहे, हें खालील तक्ता स्पष्ट करील:—

कापड: उत्पादन व निर्गत
( कोटी चौरस वार )

| कांहीं प्रमुख देश | उत्पादन | | निर्गत | |
|---|---|---|---|---|
| | १९३६-३८ सरासरी | १९४७ | १९३६-३८ सरासरी | १९४७ |
| ग्रेट ब्रिटन ... | ३५० | १८० | १७४ | ५३ |
| अमेरिका ... | ८५३ | १०८० | २५ | १५० |
| जपान ... | ४२३ | ६६ | २५१ | ४० |
| हिंदुस्थान ... | ३९२ | ३६० | २०० | २५० |
| पाकिस्तान ... | ... | ७ | ... | ... |
| फ्रान्स ... | १४० | १३० | ३७ | ३२ |
| प. जर्मनी ... | २०० | ७० | १९ | २ |
| रशिया ... | ३६० | २५० | २० | ... |
| एकूण ... | ३,२०५ | २,७३१ | ६३० | ३६९ |


## नानूज् ब्रास वर्क्स लि., मुंबई

अधिकृत भांडवल २५,००,००० रु. | विक्रीस काढलेलें भांडवल ५,००,००० रु.

प्रत्येक शेअर ५० रु.चा. अर्जासोबत १२ रु. ८ आ. ॲलॉटमेंटनंतर १२ रु. ८ आ.

**डायरेक्टर बोर्ड**

सर माधवराव जी. देशपांडे, नागपूर ( चेअरमन ) | शेठ चरणदास व्ही. मरिवाला, मुंबई.
श्री. जी. आर. साठे, पुणें. | श्री. एम. व्ही. पोतनीस, मुंबई.
रा. ब. जी. जी. ढेंबिकर, बारामती | श्री. डी. एस. भावे, पुणें.
शेठ वसनजी हि. पोपट, मुंबई. | श्री. के. जी. कर्णिक, मुंबई.

**रजिस्टर्ड ऑफिस**

२६९ प, गिरगांव रोड, ठाकुरद्वार, मुंबई ४.

श्री. के. जी. कर्णिक, ह्यांचेकडून नानूज् ब्रास वर्क्स नांवाखालीं चालविण्यांत येणारा धंदा विकत घेऊन हॉस्पिटल्स, लॅबोरेटरीज, दवाखाने, ऑपरेशन थिएटर्स, इत्यादींस लागणाऱ्या जिनसा व उपकरणें तयार करण्याचा व पुरविण्याचा व्यवहार प्रस्तुत कंपनी मुख्यतः करणार आहे. वरील ब्रास वर्क्सचा धंदा ५० वर्षे चालू आहे; त्यांत सुधारणा व वाढ करण्यांत यावयाची आहे.

शेअर्स, वगैरेसाठी पत्रव्यवहार करा:—

श्री. ए. एस. साठे, "उल्हास," जंगली महाराज रोड, पुणें ४

**मेसर्स कर्णिक अँड भावे लि.**
मॅ. एजंटस

## उद्बोधक उद्गार

### ब्रिटिश व्यापारी दृष्टिकोनांतून हिंदुस्थान सरकारचें औद्योगिक धोरण

"उच्च श्रेणींतील उत्पन्नावर इतका जबर कर घेण्यांत येत आहे कीं हिंदी उद्योगपतींना कोणताही नवा धंदा काढण्यांत अर्थ नाहीं, असें वाटूं लागलें आहे. ही गोष्ट हिंदुस्थान सरकारच्या ध्यानांत आल्याखेरीज हिंदुस्थानांत औद्योगिक प्रगति होणार नाहीं. हिंदी उद्योगपतींना अजूनही असें वाटतें कीं मोठ्या प्रमाणावर राष्ट्रीयीकरण करण्याचा सरकारचा विचार आहे. पण, मला तसें वाटत नाहीं. हिंदी सरकारनें नुकतीच जी औद्योगिक धोरणाची घोषणा केली आहे, ती खरोखरच प्रगतिकारक आहे. ह्या घोषणेवरून असें दिसतें कीं हिंदुस्थान आज समाजवादी अर्थव्यवस्थेसारखा आमूलाग्र बदल करण्यास योग्य नाहीं ह्याची सरकारला जाणीव आहे. ब्रिटनमधील तज्ज्ञ व भांडवल हीं स्वीकारण्याची हिंदुस्थानांत आज बरीच तयारी दिसून येते. ह्या बाबतींतला पूर्वीचा अलिप्तपणा आतां राहिलेला नाहीं":— इंडिअन लेजिस्लेटिव्ह असेंब्लीमधील युरोपिअन गटाचे एक माजी पुढारी सर पर्सीव्हल ग्रिफिथ ह्यांचें लंडन येथील ईस्ट इंडिआ असोसिएशनमधील भाषण.

---

### भाडें नियंत्रण कायदा*

"रोजच्या व्यवहारांत घरमालक व भाडेकरी ह्यांनीं घरून आपलें वर्तन कसें ठेवावें, हें त्यांचे लक्षांत ताबडतोब येण्याचे दृष्टीनें, विषयांचे गट पाडून त्यावर विवरणात्मक व संकलनात्मक प्रकरणें प्रस्तुत पुस्तकांत लिहिलेलीं आहेत. अनुषंगानें, न्यायालयीन निवाड्यांचाहि ठिकठिकाणीं परामर्श घेतला आहे. नेहमीप्रमाणें मूळ इंग्रजी हें परिशिष्टांत एकत्रित दिलेलें आहे." कायद्याचा संक्षिप्त इतिहास, स्टँडर्ड रेंट, घरमालकांना ताबा केव्हां मिळेल, भाडेकऱ्यांचे हक्क व जबाबदाऱ्या, पोट भाडेकरी, कोर्टें व त्यांचे अधिकार, गुन्हे व शिक्षा, संकीर्ण पण महत्त्वाचे, अशा वेगवेगळ्या प्रकरणांत पुस्तकाची विभागणी केली असल्यानें पुस्तक अत्यंत सुबोध झालें आहे. प्रारंभीं कलमवार अनुक्रमणिका दिली आहे. लॉ ॲकॅडेमीच्या इतर पुस्तकांप्रमाणें हें पुस्तकहि लोकप्रिय झालें आहे.

---

### महाराष्ट्र की. रिजनल स्कूलबोर्डाचे नवे चेअरमन व सभासद

म. को. रिजनल स्कूल बोर्डाचे चेअरमन श्री. य. द. खोले ह्यांनीं आपल्या जागेचा राजीनामा दिला, तेव्हां चेअरमनचे जागीं श्री. बी. डी. देशमुख, जळगांव ह्यांची नेमणूक इन्स्टिट्यूटनें केली असून श्री. ग. रा. तुळशीबागवाले, पुणें ह्यांची बोर्डाचे सभासद म्हणून नेमणूक करण्यांत आली आहे, असें समजतें.

---

### श्री. व. वि. लोणकर

"अर्था"च्या वाचकांचे सुपरिचित श्री. व. वि. लोणकर, एम. ए., एलएल. बी., हे भोर स्टेट बँक लि. चे ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून पुणें येथें काम करणार आहेत, असें समजतें.

*तयार करणार : लॉ ॲकॅडेमी, ७२०, सदाशिव, पुणें २. पृ. सं. ६८+३६. किं. २.


## दी भारत इंडस्ट्रिअल बँक, लि०

हेड ऑफिसः—पुणें शहर


शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, बेलापूर रोड, ओझर ( जि. नाशिक ), खोपोली पे ऑफिस:

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... ... | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल ... | रु. ७,९३,८१० |
| वसूल झालेलें भांडवल ... | रु. ३,९६,२४५ |
| एकूण खेळतें भांडवल ... | रु. ५५ लाखांचेवर |

चेअरमनः—श्री. के. वि. केळकर, M. A., LL. B. (वकील)

- गतवर्षी ऑर्डिनरी शेअर्सवर चार टक्के अधिक अर्धा टक्का करमाफ डिव्हिडंड दिलें.
- मुंबई, नगर, नाशिक, बंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे ठिकाणीं डिमांड ड्राफ्टस् दिले जातात.
- बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

एन. एन. क्षीरसागर,
आर. बी. साळवेकर,
बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग डायरेक्टर्स.



अधिक धान्य पिकविण्याची योजना

—यशस्वी होण्यास—

किर्लोस्कर पंपिंग सेट्स

हें अमोघ साधन आहे.

त्याचें सहाय घ्या !

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी

## पुणें येथील औद्योगिक वसाहतीची योजना

### दि उद्योगपूर वसाहत मंडळ लि. चा उपक्रम

महाराष्ट्र कारखानदार संघानें पुण्याच्या आसपास चांगलीशी जागा पाहून तेथें कारखान्यांस जरूर असणाऱ्या सर्व सोयी उपलब्ध करून देण्याचें ठरविलें; त्याचें मूर्त स्वरूप म्हणजे दि उद्योगपूर वसाहत मंडळ लि. हें होय. ह्या कंपनीचे चेअरमन श्री. द. बा. फाटक हे असून श्री. वि. म. देवल, बी. कॉम., हे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. वसाहत योजनेची रूपरेषा खालीलप्रमाणें आहे:—

१ पुण्यापासून सुमारें ८ ते ९ मैलांवर, चिंचवड स्टेशनच्या अलीकडे, पिंपरी–वाघेरी या गांवाशेजारी सुमारें ६५० एकरांचें एक विस्तृत माळरान आहे. सदर जागेवर वसाहत करावयाचें ठरलें आहे. या जागेलगतच सुमारे आणखी ६०० एकरांची जागा मिळण्याची शक्यता आहे. अशा तऱ्हेनें १,२५० एकरांची जागा वसाहतीसाठी तयार करण्याचा विचार आहे.

लवकरच अस्तित्वांत येऊं घातलेल्या पुणें कॉर्पोरेशनच्या कक्षेनजीकच ही जागा येते. अर्थातच शहरसान्निध्याचे अनेक फायदे या जागेंत वसाहत करणारांना लाभूं शकतील.

ही सर्व जागा पूना इलेक्ट्रिक सप्लाय कंपनी लि. च्या पुरवठाक्षेत्राच्या कक्षेलगत येत असल्यानें विद्युत्पुरवठ्याच्या बाबतींत विशेष आयास पडण्यासारखे नाहींत.

या जागेस पाणीपुरवठा खडकवासल्यापासून नळ टाकून किंवा शेजारच्या पवना नदीस बंधारे घालून मिळवतां येणें शक्य आहे.

जमिनींत थोडक्याच अन्तरावर मजबूत दगड लागत असल्याकारणानें पाया घालण्याचा खर्च खूपच कमी होऊन इमारती बांधणें सोयीचें व स्वस्त होणार आहे.

ही सर्व जागा सर्वसाधारणपणें समुद्रसपाटीपासून १,९५० फूट उंच येईल. जागा अतिशय हवेशीर आणि म्हणून सार्वजनिक आरोग्यास हितप्रद अशी आहे.

२ अशा प्रकारची ही जागा सर्व प्रकारें तयार (डेव्हलप्) करण्यासाठी 'दि उद्योगपूर वसाहत मंडळ लि.' या नांवाची एक मर्यादित जबाबदारीची कंपनी स्थापन करण्यांत आली आहे. कंपनीचें भांडवल पन्नास लाख रुपयांचें राहणार असून तें प्रत्येकी रुपये १०० च्या ५०,००० सामान्य भागांत (ऑर्डिनरी शेअर्स) विभागलेलें आहे. कंपनीची जागा भाड्यानें घेऊन त्यांत कारखाना उभारूं इच्छिणाऱ्या व्यक्तीनें अगर कंपनीनें ती घेऊं इच्छित असलेल्या जागेच्या प्रत्येक एकरामागें कंपनीचे दर्शनी किंमतीचे सुमारे रुपये पांच हजारांचे शेअर्स विकत घेतले पाहिजेत म्हणजे त्या व्यक्तीस तेवढी जागा भाड्यानें देतां येईल. हा भाडेपट्टा सुमारे तीस अगर कमी-अधिक वर्षांच्या करारानें केला जाईल.

हा भाडेपट्टा दुसऱ्यास वर्ग करून देतां येईल. मात्र हा बदल कंपनीच्या संमतीनें आणि तिच्या नियंत्रणाखाली करावा लागेल. कंपनीची जागा न घेणारांसहि कंपनीच्या भांडवलाचे भाग खरीदतां येतील.

कंपनीची सर्व व्यवस्था डायरेक्टर बोर्डाच्या आदेशानुसार पगारी व्यवस्थापक (मॅनेजिंग डायरेक्टर) पाहील व तो एक्स्-ऑफिशिओ डायरेक्टर म्हणून राहील.

भांडवलावर पांच टक्केपर्यंत डिव्हिडंड दिलें जाईल.

३ कंपनी वरील जागा विकत घेईल व ती डेव्हलप् करून कारखानदारांना भाड्यानें देईल. शक्य तर कारखान्यासाठी व राहण्यासाठी लागणाऱ्या इमारती बांधून त्याहि कंपनी भाड्यानें देईल. जागेचे तीन विभाग केले जातील. एका विभागांत कारखाने, दुसऱ्या विभागांत मजुरांसाठी आणि मालक व अधिकारी वर्ग यांच्यासाठी घरें आणि तिसरा विभाग बाजारपेठ (शॉपिंग एरिया) म्हणून राहील. कारखानदारांनी घेतलेली जागा पहिल्या दोन विभागांत वांटली जाईल. वीज, पाणी, ड्रेनेज, रस्ते, रेल्वे सायडिंग, टेलिफोन वगैरेसंबंधी व्यवस्था कंपनी करील.

वसाहतींत एक किंवा अधिक डिपार्टमेंटल स्टोअर्स कंपनी चालवील. इतरांना दुकानें काढण्यास प्रत्यवाय असणार नाहीं.

वसाहतीमध्यें शाळा, दवाखाने, हॉस्पिटल्स्, देवळें, संशोधनशाळा, सार्वजनिक क्रीडांगणें, उद्यानें, पोहण्याचे तलाव, सभागृहें, चित्रपटगृहें, नाट्यमंदिर इ. तयार करून चालविण्याची जबाबदारी कंपनी घेईल.

जरूर तर हॉटेल्स, लॉजिंग-बोर्डिंग हाऊसेस (उपाहारगृहें व खाणावळी) कंपनी चालवील.

कारखानदारांचें सहकार्य मिळाल्यास त्यांना लागणारा कच्चा माल आणवून देणें व पक्क्या मालाच्या विक्रीची व्यवस्था करणें हीं कामें कंपनी करील.

अशा तऱ्हेनें वसाहतींत दाखल होणाऱ्या कारखान्यांसाठी आदर्श परिस्थिति निर्माण करून औद्योगिक उत्पादन वाढविण्यास व पर्यायानें कारखानदारांच्या वैयक्तिक उत्कर्षास सर्वतोपरी हातभार लावण्याचें कार्य कंपनीकडून होणार आहे.

---

### दारूबंदीचा प्रचार

प. खा. जिल्हा दारूबंदी समितीतर्फे डॉ. रामभाऊ भोगे, रिजनल प्रोहिबिशन ऑफिसर, यांचा श्री. म. ना. सावंत जिल्हा दारूबंदी अधिकारी यांच्यासह ६ दिवस दौरा आंखण्यांत आला होता. या सहा दिवसांत त्यांनीं फैजपूर, पाचोरें, रावेर आणि भुसावळ येथें जाहीर व्याख्यानें दिलीं. तसेंच जळगांव, चोपडें, यावल, अमळनेर या गांवांना भेटी देऊन दारूबंदी प्रचार योजनेबाबत विचारविनिमय केला. दारूबंदी प्रचार यशस्वी होण्याच्या दृष्टीनें पुढील गोष्टी होणें अत्यंत जरूर असल्याचें त्यांनीं सांगितलें.

(१) ज्या अनेक संस्था खेड्यापाड्यांतून शेतकऱ्यांमध्यें काम करीत आहेत त्यांनीं आपल्या कामाबरोबरच दारूबंदीचा प्रचार करावा.

(२) प्राथमिक शाळेंतील शिक्षकांनीं तसेंच हायस्कूल व कॉलेजमधील अध्यापकांनीं दारूबंदी प्रचार–वाङ्मय व दारूबंदी प्रचार-पथकें निर्माण करण्याचें कामीं सहकार्य करावें.

(३) ठिकठिकाणचीं भजनी मंडळें, हरिदास, कीर्तनकार, खेड्यांतील हौशी नाटक मंडळ्या, पोवाडे म्हणणारे, शाहीर, इत्यादि मंडळींनीं आपल्या कार्यक्रमांत दारूबंदी प्रचाराचा अंतर्भाव करावा.

(४) शाळा–कॉलेजांतून आंतरशालेय दारूबंदी विषयावर वक्तृत्वाची चढाओढ जाहीर सभांमधून ठेवून दारूबंदीस अनुकूल असें लोकमत बनविणें.

---

**चिनी सरकारी लष्कराची खराबी**—चिनी यादवींत सरकारच्या बाजूनें लढणाऱ्या १३ तुकड्यांना अमेरिकन शिक्षकांकडून अमेरिकन शिक्षण व हत्यारें मिळालीं होतीं. एका तुकडींत ३ पथकें असतात. ह्या १३ तुकड्यांपैकीं आतां फक्त ७ च तुकड्या युद्धाच्या दृष्टीनें कार्यक्षम राहिल्या आहेत अशी बातमी चिनी सरकारच्या एका प्रवक्त्यानें नुकतीच जाहीर केली. चीनमधील कम्युनिस्ट लष्कराला अमेरिकन मदत मुळींच मिळत नाहीं, हें प्रसिद्धच आहे.

## कर्जदारांस संरक्षण

कर्जदारांपैकीं बहुसंख्य शेतकरी वर्गातील असून त्यांना मदत व्हावी म्हणून मुंबई सरकारनें १९४६ चा सावकारी नियंत्रण कायदा पास केला. हा कायदा १७ नोव्हेंबर १९४७ पासून अंमलांत आला आहे.

कायद्यांतील ठळक योजना पुढील आहेत:-

परवान्याशिवाय सावकारी करणें बेकायदा आहे. प्रत्येक सावकारानें ठराविक तक्त्याप्रमाणें हिशेब ठेवले पाहिजेत व कर्जदारानें मागणी केल्यावर वेळोवेळीं त्याला हिशेबाचे उतारे दिले पाहिजेत.

व्याजाचा दर सरकारनें ठरवून दिलेल्या दरापेक्षां जास्त असता कामा नये आणि व्याजाची सर्व रक्कम मूळ मुद्दलापेक्षां जास्त होता कामा नये.

कोऱ्या कागदावर कर्जदाराची सही घेणारा अगर जादा रक्कम नोंदणारा सावकार या कायद्यानें शिक्षेस पात्र होईल.

कर्जदारास शारीरिक त्रास देणें हा शिक्षेस पात्र असा गुन्हा आहे.

हुकूमनाम्याचे अंमलबजावणीसाठी शेतकरी-कर्जदारांना अटक होऊं शकणार नाहीं, अगर तुरुंगांत टाकता येणार नाहीं.

कर्जदाराला कर्जाची अगर व्याजाची फेड केव्हांही करता येईल. देऊं केलेली रक्कम (सावकारानें) नाकारल्यास कर्जदारास ती कोर्टांत भरता येईल. कोर्टातर्फे नंतर हिशेब पुरा केला जाईल.

---

नवीं पोस्ट ऑफिसें—१६ ऑगस्ट, १९४७ ते ३१ मार्च, १९४८ ह्या मुदतींत हिंदुस्थानांत एकूण १,११५ नवीं पोस्ट ऑफिसें खेडेगांवांतून उघडण्यांत आलीं. शहरांतून उघडलेल्या पोस्ट ऑफिसांची संख्या १८३ होती. म्हणजे आतां एकूण ३,७३१ पोस्ट ऑफिसें शहरांतून व १८,१४९ पोस्ट ऑफिसें खेड्यांतून चालू आहेत.

---

D. E. SOCIETY'S

## Brihan-Maharashtra College Of Commerce, Poona 4.

Applications for fresh admission to the First Year and B. Com. classes will be received up to the 10th June 1948. The College prospectus containing the application form will be sent on receipt of three annas. Applications received after 10th June will not be considered.

D. G. Karve
Principal

## नवीन भाडें नियंत्रण कायदा

| | |
|---|---|
| सुबोध विवरण व संकलन | किं. १ रु. |
| मुंबई सावकारी कायदा | किं. २॥ रु. |
| कूळ कायदा, आवृत्ति ३ री | किं. ३ रु. |
| द्विभार्या प्रतिबंधक कायदा | किं. १ रु. |
| हिंदू घटस्फोट कायदा | किं. १ रु. |
| शेतकरी कर्जनिवारण कायदा — कापडी | किं. ४॥ रु. |
| शेतकरी कर्जनिवारण कायदा — कागदी | किं. ४ रु. |

हीं सर्व पुस्तकें आजतागायतच्या दुरुस्त्यांसह असून त्यांत अद्ययावत् न्यायालयीन निर्णय, चिकित्सक व सविस्तर टीपा व मूळ इंग्रजी टेक्स्ट आहेत. हीं पुस्तकें पुण्याच्या व्यवसायी वकिलांनीं तयार केलीं आहेत.

पत्ता—लॉ अॅकेडेमी, ७१० सदाशिव, पुणें २.

## पीपल्स कॉमनवेल्थ
## को-ऑपरेटिव्ह कॉलनायझेशन सोसायटी लिमिटेड.

# —अमृतनगर—

३१ मे १९४८ तारीख उलटली. योजनेच्या आरंभापासून तिच्या उभारणीस मदत करणारे कोण व लँड ॲक्विझिशन ऑफिसरकडे तक्रार नोंदवून विरोध करणारे कोण याची बरीचशी कल्पना आली.

विरोधकांना योजनेंत घेणें हें केव्हांही हितकारक ठरणार नाहीं हें उघडच आहे.

योजनेला आरंभापासून सहाय्य करूं इच्छिणारांपैकीं ज्यांच्याशीं पत्रव्यवहार चालूं आहे अशांच्या बाबतींत सवलती मिळण्यासाठीं सभासद होऊन डिपॉझिट ठेवण्याची मुदत तारीख १५ जून १९४८ पर्यंत वाढविली आहे. सवलती पुढील बाबतींत आहेत.

१— प्लॉटवर जादा आकार पडणार नाहीं.

२— सहाय्यक बोनस फंडातून योजना पुरी होण्याच्या वेळीं ठेवीवर १२ टक्केपर्यंत बोनस.

३— बाजारपेठतील प्लॉटवर ठेवींच्या प्रमाणांत अग्रहक्क.

४— ठेवीवर द. सा. दरशेंकडा ३ टक्के व्याज.

१५ जून १९४८ पासून पुढें पण ३१ जुलै १९४८ पर्यंत योजनेचे सहाय्यक म्हणून येणारास वरील सवलतींपैकीं

१— प्लॉटवर जादा आकार पडणार नाहीं.

२— बोनस फंडातून ६ टक्के बोनस.

३— ठेवींवरील व्याजाचा दर दरसाल दरशेंकडा ३ टक्के.

एवढ्याच सवलती रहातील.

कित्येक जमिनींच्या मालकांना योजनेची उपयुक्तता पटली असून योजनेच्या कामीं सहकार्य करण्याची तीव्र इच्छा आहे. पण धाकदपटशाला व गुंडगिरीला भिऊन आज उघडपणें योजनेच्या कार्यांत येऊं शकत नाहींत. असल्या गुंडगिरीचा पुरा बंदोबस्त करण्यासाठीं जरूर ते इलाज योग्य वेळीं अमलांत आणण्याची व्यवस्था व्हावयाची असली तरी गुंडगिरीला भिऊन चांगल्या कार्यांत भाग घेण्यास पुढें न येणारांनाही त्यांच्यासाठीं योजलेल्या खास सवलती मिळणार नाहींत हें स्पष्ट आहे. सोसायटीचे सभासद होऊन व ठरल्याप्रमाणें योजनेशीं सहकार्य करून खास सवलती मिळविण्याची मुदत जमिनीच्या मालकांना ३० जून १९४८ पर्यंत वाढविण्यांत येत आहे.

१ जून १९४८ शंकर रामचंद्र भागवत

---

## DECCAN INSTITUTE OF COMMERCE, POONA.

(Recognised by Government.)

Opens for the 1948-49 Session on Thursday the 24th inst. Students coached up for the G.D.C. and C., L. C. C., D. Com. (I. M. C.), R. A. (1st), G. D. C. and A., A. C. W. A., A. C. C. S., Short-hand and Typewriting. Courses suitable for Non-matriculates, Matriculates and Graduates. Classes in the Morning and Evening. Prospectus free on application to:

Institute's Building,
594, Budhwar Peth,
Jijamata Bag Corner,
Poona 2.

Secretary.

### बटाट्यांची लागवड वाढविण्याची योजना

मुंबई प्रांतांत पुढील खरीप हंगामांत बटाट्यांची लागवड अधिक प्रमाणांत करण्याची एक योजना मुंबई सरकारनें मंजूर केली आहे.

या योजनेसाठी १७,०७,०९२ रु. खर्च करण्यास डायरेक्टर ऑफ ॲग्रिकल्चर यांना अधिकार देण्यांत आला आहे. या योजनेंत जवळजवळ एक लक्ष, दहा हजार रुपयांचें नुकसान येईल असा अंदाज आहे. हें नुकसान सरकार स्वतः सोसणार असून तें योजनेसाठीं दिलेली आर्थिक मदत म्हणून समजण्यांत येईल.

सातारा, बेळगांव, अहमदनगर, धारवाड व नाशिक या जिल्ह्यांतील गरीब शेतकऱ्यांना ३ टक्के दरानें तगाई कर्जें देण्यासाठी म्हणून सरकारनें १२,००,००० रु. मंजूर केले आहेत. या कर्जांतून त्यांना शेतकी खात्याकडून बटाट्याचें बीं व भुइमुगाची पेंड खरेदी करतां येईल.

तगाई कर्ज शेतकऱ्यांकडून हंगामानंतर, परंतु ३१ डिसेंबर १९४८ च्या आंत वसूल केलें जाईल.

---

### हिंदी अधिकाऱ्यांच्या विलायतच्या वाऱ्या

हिंदुस्थान सरकारतर्फें परदेशीं जाणाऱ्या शिष्टमंडळांच्या संख्येंत एकसारखी वाढ होत आहे, आणि डॉलर्सचा तुटवडा त्यांच्या मार्गांत येत नाहीं. श्री. षण्मुखम् चेट्टी ह्यांच्या नेतृत्वाखालीं पौंडी शिलकांच्या वाटाघाटींसाठी जें शिष्टमंडळ इंग्लंडला गेलें आहे, त्यांत एकूण ३५ स्त्री-पुरुष आहेत ! कांहीं महिन्यांपूर्वीं ह्याच संबंधांतील वाटाघाटींसाठी एक ब्रिटिश शिष्टमंडळ येथें आलें होतें, त्यांत फक्त तिघेच सभासद होते. हिंदी वरिष्ठ अधिकारी चैनीच्या प्रवासांसाठीच केवळ अशा रीतीनें जनतेच्या पैशानें प्रवास करतात अशी टीका त्याबाबत करण्यांत येते. आपल्या मंत्र्यांना व अधिकाऱ्यांना पुरेसा अनुभव नसल्याकारणानें, तातडीनें निर्णय घेण्याची त्यांस भीति वाटते व आपल्या निर्णयांत शक्य तेवढे जबाबदार अधिकारी समाविष्ट करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो, असें त्यांच्या बाजूनें म्हणतां येण्यासारखें आहे. हिंदी पार्लमेंटाच्या येत्या बैठकींत ह्या विषयावर प्रश्न विचारले जातीलच.


---

### टाटा डिफर्डसंबंधीं वाटाघाटी

शुक्रवार, ता. ४ रोजीं टाटा आयर्न अँड स्टील कंपनी लि. नें आपल्या कांहीं प्रमुख भागीदारांना टाटा डिफर्ड शेअर्सच्या पुनर्रचनेच्या योजनेबाबत चर्चा करण्यासाठी बोलाविलें होतें. ही चर्चा अपुरी राहिली, ती ता. २३ जून रोजीं पुढें चालू होईल. एका डिफर्डला पांच ऑर्डिनरी शेअर्स ह्या प्रमाणांत डिफर्डचें ऑर्डिनरींत रूपांतर करण्यास कंपनीची तयारी आहे, परंतु डिफर्ड भागीदारांचें तेवढ्यानें समाधान नाहीं.

प्रत्येक डिफर्ड शेअरला सहा नवे डिफर्ड शेअर्स विक्रीस काढण्याची दुसरी एक योजना आहे. सध्या एकूण ४८,७५० डिफर्ड शेअर्स आहेत, ते त्यामुळें २,९२,५०० होतील. सध्याचे ऑर्डिनरी शेअर्स ३,५०,००० आहेत. डिफर्ड शेअर्सची संख्या वाढली, म्हणजे त्यांचेमधील सट्टेबाजी कमी होईल, अशी एक कल्पना आहे. डिफर्ड शेअरची मूळ किंमत ३० रु. आहे. नवा शेअर ४५ रु. वाढव्यानें, म्हणजे प्रत्येकीं ७५ रु. स विक्रीस काढला तर कंपनीस ह्या वाढव्याचे २½ कोटी रुपये मिळतील. ही रकम कंपनीच्या कारखान्याच्या भांडवली खर्चास उपयोगी पडेल.

टाटा डिफर्डचा चालू भाव सुमारें १६५० रु. आहे, व टाटा ऑर्डिनरीचा भाव सुमारें ३२५ रु. आहे.




नवीन पुष्कळ निघाले, तरी
**तुळजाराम मोदी,**
**सातारा**
ह्यांचें पुढारीपण कायम आहे.

**दि सांगली स्टेट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि., सांगली**
(स्थापना सन १९२७)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | ५,००,००० रु. |
| खपलेलें भांडवल | १,५४,३५० रु. |
| भरलेलें भांडवल | ८८,००० रु. चे वर |
| रिझर्व्ह व इतर फंड | १,०७,००० रु. चे वर |
| खेळतें भांडवल | ११,००,००० रु. चे वर |

या बँकेंत मुदतीच्या, सेव्हिंग व करंट ठेवी स्वीकारल्या जातात. बँकेचे सभासदांना, सोसायट्यांना व व्यक्तिशः भागिदारांना योग्य तारणावर कर्जें दिलीं जातात. वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा व इंडिया इक्विटेबल इं. कं. लि. कलकत्ता, या कंपन्यांचे विम्यांचे हप्ते स्वीकारले जातात. चेक-हुंड्यांची खरेदीविक्री, सरकारी कर्जरोखे व शेअर्स यांची खरेदीविक्री व व्याज वसुली वगैरे

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार**
**या बँकेमार्फत केले जातात.**

बँकेनें नवीन शेअर्स विक्रीस काढले असून शेअर विक्री चालू आहे. प्रत्येक शेअर रु. ५०/- चा असून अर्जासोबत दर शेअरमागे रु. २५/- ( रु. ५/- प्रिमीयम् म्हणून व रु. २०/- अर्जासोबतचे ) रक्कम भरणेची आहे. उरलेली रु. ३०/- ची रक्कम जरूर लागेल त्यावेळीं रु. १०/- चा. एक या प्रमाणें ३ हप्त्यांनीं वसूल करणेंत येईल. दोन हप्त्यामधील अंतर ३ महिन्याचेपेक्षां कमी असणार नाहीं. शेअर अर्ज व इतर माहिती पाहिजे असल्यास बँकेचे ऑफिसमध्यें मिळेल.

**ना. पां. ठाणेदार**
मॅनेजर

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व
प्रा. रा. [illegible] वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.